**नि .फौ.ख.क्र. ८८/२०२०**
**शासन –वि– लक्ष्मण व ईतर**
**नि.क्र. ४३**

**सरकार तर्फे सा. क्र.०४ यांची साक्ष**
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांवः– **पुजा देविदास डूमणे,**
वय– **२५** वर्षे, धंदा– **शिक्षण.**
रा. सायखेड ता.धर्माबाद जि. नांदेड.

**<u>सरतपासणी श्री.ए.ए.शिखरे, सहा. सरकारी वकील, अभियोग पक्षा तर्फे</u>**

फिर्यादी देविदास हे माझे वडील आहेत. मला तीन बहिणी व एक भाऊ आहे. भावाचे नाव सतिश देविदास डुमणे असे व बहिणींची नावे दिक्षा, सुप्रिया, गंगासागर अशी आहेत. माझे वडील शेती करतात. आमची सायखेड शिवारात गट क्र.८२ मध्ये साडे दहा एकर जमीन आहे. गट क्र.८२ मध्ये आमचे राहते घर आहे. मी आरोपींना ओळखते. ते माझ्या भावकीतील आहेत. सर्व आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. आरोपींचे घर आमच्या गावात आहे. आमच्या घरापासुन त्यांचे घर ८०० मिटर अंतरावर आहे.

०२. दिनांक ३१/०७/२०२० रोजी शुक्रवारी दुपारी ४.०० वाजण्याच्या सुमारास लक्ष्मण डुमणे, शंकुतला डुमणे, अमृत डुमणे, निर्मलबाई हे आरोपी आमच्या घरात शिरले व तुम्ही शेत का पेरलात, तुम्ही लई माजलात, असे म्हणुन माझ्या वडीलांना लाथाबुक्यांने मारहाण केली व लक्ष्मण डुमणे याने काठीने माझ्या वडीलांच्या कपाळावर मारले. त्यात माझ्या वडीलांच्या डाव्या डोळयाला व उजव्या गुडघ्याला मार लागला. वडीलांना मारहाण झाली तेंव्हा आम्ही सर्व भांवड घरी होतो. आम्ही सोडवायला गेलो असता त्यांनी आम्हाला केस धरुन लाथाबुक्यांनी मारहाण केली, तुमच्या मायची, झिणाल्या, तुम्ही शेतात आल्या तर झवतो असे अनेक घाण घाण शब्द वापरुन अश्लील शिवीगाळ केली. शेतात पुन्हा आलात तर तुम्हाला मारुन टाकतो, अशी जिवे मारण्याची धमकी दिली. मारण्याची धमकी दिल्यामुळे आम्हाला भिती वाटली.

०३. आरोपींनी माझ्या डाव्या हाताला व कोपराला मारहाण केली. ज्या काठीने

आरोपींनी माझ्या वडीलांना मारहाण केली. ती मला दाखवली तर ती मी ओळखु शकते. आता मला **वस्तु निशाणी–अ** वरील एक काठी दाखवली. याच काठीने आरोपींनी माझ्या वडीलांना कपाळावर मारले आहे.

०४. भांडण झाल्यानंतर आम्ही धर्माबाद पोलीस स्टेशन येथे आलो. पोलीसांनी आम्हाला धर्माबाद येथील सरकारी दवाखाण्यात पाठविले. दवाखाण्यामध्ये आम्ही सर्वजण गेलो. तेथील डॉक्टरांनी आमच्यावर औषधोपचार केले. माझे वडील पोलीस स्टेशनला गेले. तेथे त्यांनी आरोपींविरुद्ध तक्रार दिली.

सरतपास–पुर्ण

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. के.एम.आढाव यांच्यामार्फत उलटतपास सुरु.</u>**

०५. माझे शिक्षण विदयुत अभियांत्रिकी शाखेमधील तिस–या वर्षामध्ये चालु आहे. गट क्र. ८२ मध्ये माझ्या आजोबांची शेती आहे येवढेच मला माहिती आहे ईतर किती लोकांची जमीन आहे हे मला माहिती नाही. गट क्र.८२ मधील जमीनीबाबत अंदाजे ०७ ते ०८ वर्षापासुन आरोपींसोबत आमचा वाद चालु आहे. गट क्र.८२ मधील जमीनीचे न्यायालयाचे आदेशानुसार वाटप झाले आहे, हे मला माहिती आहे. बिलोली येथील न्यायालयात शेतजमीनीबाबत न्यायनिर्णय झाला आहे, हे मला माहिती नाही. मा.उच्च न्यायालयात जमिनीबाबत वाद चालु होता, हे मला माहिती नाही. या जमीनी बाबत मला माहिती आहे की, सन १९५६ साली माझे आजोबा जळया डुमणे यांना गायरान शेतजमीनीचा पट्टा मंजुर झाला होता, तेंव्हा पासुन माझे आजोबा व त्यानंतर माझे वडील ती जमीन कसुन खात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जमीनीबदलचा मजकुर मी माझ्या वडीलांच्या सांगण्यावरुन सांगितला आहे.

०६. आरोपी दुपारी ०४.०० वाजता आमच्या घरामध्ये आले. आमच्या घरात पहिल्यांदा लक्ष्मण डुमणे आला. त्यानंतर ईतर आरोपी लगेच आले. आरोपी आमच्या घरात आल्यानंतर कोणी कोणाला मारले, हे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वडीलांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. पोलीसांनी माझे बयाण दिनांक ०१/०८/२०२० रोजी घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष

दिली आहे.

०७. पोलीसांना बयाण देते वेळी 'तुमच्या मायची, झिणाल्या, तुम्ही शेतात आल्या तर झवतो असे अनेक घाण घाण शब्द वापरले' असे सांगितले नव्हते. साक्षीदार सांगते की, बयाण देतेवेळी पोलीसांपुढे मला तसे शब्द सांगायला मला लज्जास्पद वाटले त्यामुळे मी सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर नमुद शब्दात आरोपींनी शिवीगाळ केल्याचे मी खोटे सांगितले आहे, प्रत्यक्षात आरोपींनी तशा शब्दात शिवीगाळ केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आमच्या घरात कधीही आले नाहीत, त्यांनी माझ्या वडीलांना काठीने मारहाण केली नाही, तसेच त्यांनी आम्हाला शिवीगाळ केली नाही व मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सुड भावनेने मी आरोपींविरुद्ध खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास–पुर्ण**

**फेरतपास–नाही.**

| | |
|---|---|
| वा.दा.ब.अ.क.केले | श्रवणोत्तर स्विकृती |
| SANJAY MARUTI KOLEKAR — Digitally signed by SANJAY MARUTI KOLEKAR Date: 2025.06.18 16:38:49 +0530 | SANJAY MARUTI KOLEKAR — Digitally signed by SANJAY MARUTI KOLEKAR Date: 2025.06.18 16:38:53 +0530 |
| (एस. एम. कोळेकर) | (एस. एम. कोळेकर) |
| न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, धर्माबाद | न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, धर्माबाद |

दि. १८–०६–२०२५